## नाविन्यपूर्ण योजना

**पशुपैदासीस चालना देणे, दुग्ध उत्पादनात लक्षणीय वाढ व स्वयंरोजगार निर्मिती करणे.**

### दोन दुधाळ जनावरांचे वाटप



शासनाने विहित केल्यानुसार एका गाईची रक्कम रु. ७०,०००/- व एका म्हैशीची रक्कम रु. ८०,०००/-आहे. या योजनेअंतर्गत सर्वसाधारण प्रवर्गातील लाभार्थी साठी ५०% शासकीय अनुदान रु. ७८,४२५/- दोन गाईसाठी व रु. ८९,६२९ /- दोन म्हैशी साठी विम्यासह तसेच अनुसूचित जाती/ अनुसूचित जमाती / नव बौद्ध लाभार्थीसाठी ७५% शासकीय अनुदान रु १,१७,६३८/- दोन गाईसाठी व रु १,३४,४४३/- दोन म्हैशी साठी विम्यासह निर्धारित आहे .

### शेळी गट (१०+१) वाटप



राज्यातील पशुजन्य मास उत्पादनात लक्षणीय वाढ करणे, आदिवाशी / ग्रामीण भागात स्वयं: रोजगार निर्मिती करणे. सर्वसाधारण प्रवर्गातील लाभार्थी साठी ५०% शासकीय अनुदान रु. ३९,११६ /- शेळीगट (१०+१) विम्यासह तसेच अनुसूचित जाती/ अनुसूचित जमाती / नव बौद्ध लाभार्थीसाठी ७५% शासकीय अनुदान रु. ५८,६७३ /- विम्यासह निर्धारित आहे.

### १००० मांसल कुक्कुट पक्षी संगोपनाद्वारे कुक्कुट पालन व्यवसाय सुरु करणे



सर्वसाधारण प्रवर्ग व अनु. जाती व नवबौध्द व अनु. जमाती प्रवर्गातील पशुपालकांना पक्षीगृह बांधणे व साहित्य सामुग्री करीता अनुदान देण्यात येते. योजनेची रक्कम रु. २,२५,०००/- सर्वसाधारण प्रवर्गाकरीता ५०% अनुदान रक्कम रु.१,१२,५००/- तसेच अनु. जाती व जमाती प्रवर्गाकरीता ७५% अनुदान रक्कम रु. १,६८,७५०/- निर्धारीत आहे.

### सुशिक्षीत बेरोजगारांना ७ दिवशीय कुक्कुट प्रशिक्षण देणे



इच्छुक बेरोजगार तरुण / व्यक्तींना स्वयंरोजगार विषयक प्रशिक्षण देणे. कुक्कुट पालन प्रशिक्षण देण्यात येणे कालावधी ७ दिवस
७ दिवस प्रशिक्षण शुल्क रु.१००/- अनु. जाती व जमाती प्रवर्ग
७ दिवस प्रशिक्षण शुल्क रु. २००/- सर्वसाधारण प्रवर्ग

**वरील सर्व योजनांकरीता खालील कागद पत्रे आवशयक आहेत. तरी अधिक माहितीकरीता नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखाना, पशुसंवर्धन विकास विभाग, पंचायत समिती (सर्व) व पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद, पालघर येथे संपर्क साधावा.**

- कार्यक्षेत्रातील पशुवैद्यकीय दवाखाना संस्था प्रमुखाची शिफारस
- रहिवाशी दाखला / अपत्य दाखला / शौचालय दाखला
- रेशन कार्ड सत्य प्रत
- ग्रामपंचायत नमुना नं. ८ अ सत्य प्रत
- ओळखपत्र सत्यप्रत (आधारकार्ड/इलेक्शन कार्ड पॅन कार्ड)
- दोन फोटो
- पशुसंवर्धन विषयक प्रशिक्षण प्रमाणपत्र सत्य प्रत
- बचत गट सदस्य असल्यास प्रमाणपत्र सत्य प्रत
- सक्षम अधिकाऱ्याकडील जातीच्या दाखल्याची सत्य प्रत
- रोजगार स्वयं रोजगार कार्यालयाचे नाव नोंदणी कार्डाची सत्य प्रत
- दारिद्र रेषेखाली असल्यास ग्रा. प. दाखला सत्य प्रत
- अर्ज दोन प्रतीत देणे.

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# पशुसंवर्धनातुन समृध्दीकडे...

## जिल्हा परिषद, पालघर

# पशुसंवर्धन विभाग

## पशुपालकांसाठी राबविण्यात येणाऱ्या प्रमुख योजना



**जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद पालघर**

## जिल्हा परिषद सेस फंड

### ५०% अनुदानावर महिला पशुपालकांना दुधाळ जनावर खरेदीसाठी अर्थसहाय्य



उद्देश: पशुपैदासीस चालना देणे, दुग्ध उत्पादनात लक्षणीय वाढ व स्वयंरोजगार निर्मिती करणे. शासनाने विहित केल्यानुसार गाईची रक्कम रु. ७०,०००/- व म्हैशीची रक्कम रु. ८०,०००/- आहे. या योजनेअंतर्गत ५०% जि. प. अनुदान रु. ३५,०००/- गाईसाठी व रु. ४०,०००/- म्हैस साठी निर्धारित आहे. गाईच्या/म्हैशीच्या विमा व वाहतूक खर्च लाभार्थीने स्वत: करावयाचा आहे.

### दिव्यांग पशुपालक शेतकऱ्यांना ९० % अनुदानाने दोन दुभत्या जनावरांचा पुरवठा करणे



जिल्हातील अपंग पशुपालकांना स्वयंरोजगाराची आवड निर्माण करणे दुध उत्पादनातून आर्थिक वाढ करण्यासाठी या योजने अंतर्गत शासनाने विहित केल्यानुसार एका गाईची रक्कम रु. ७०,०००/- व एका म्हैशीची रक्कम रु. ८०,०००/- आहे. या योजनेअंतर्गत ९०% जि. प. अनुदान रु. १,२६,००० दोन गाईसाठी व रु. १,४४,०००/- दोन म्हैशी साठी निर्धारित आहे. गाईच्या/ म्हैशीच्या विमा व वाहतूक खर्च लाभार्थीने स्वत: करावयाचा आहे.

### दिव्यांग पशुपालक शेतकऱ्यांना शेळी गट (१०+१) खरेदीसाठी ९०% अनुदानाने अर्थसहाय्य



जिल्हातील अपंग पशुपालकांना स्वयंरोजगाराची आवड निर्माण करणे व पशुपालकाचे उत्पन्न वाढवणे. शेळीगट (१०+१) शासनाने विहित केलेले रक्कम रु. ६८,०००/- आहे. जिल्हा परिषद ९०% अनुदान रु. ६१,२००/- निर्धारित आहे. शेळीगट (१०+१) चा विमा व वाहतूक खर्च लाभार्थीने स्वत: करावयाचा आहे.

### आपत्कालीन परिस्थितीत दगावलेल्या जनावरांच्या पशुपालकांना अर्थसहाय्य करणे



नैसर्गिक व आपात्कालीन परिस्थितीमध्ये उदा. पूर /अतिवृष्टी/ वीज कोसळून /डोंगरदरीत पडून जनावर मृत / वाडा कोसळून अथवा जळून जनावर सर्पदंश / विष बाधेने / रेबीज आजार / गंभीर आजाराने अचानक मरण पावलेल्या जनावरांच्या पशुपालकांना तात्काळ अर्थसहाय्य करणे हा योजनेचा उद्देश आहे.

## जिल्हा वार्षिक योजना - सर्वसाधारण

### वैरण विकास योजना



वैरण उत्पादनासाठी शेतकऱ्यांना उत्साहित करण्यासाठी या योजनेंअंतर्गत १००% अनुदानावर प्रती लाभार्थी रु. १५००/- चे वैरण / ठोंबे /वैरण बियाणे वाटप करण्यात येतात. सर्व प्रवर्गातील पशुपालक या योजनेचा लाभ घेवू शकतात.

### एकात्मिक कुक्कुट विकास कार्यक्रम अंतर्गत एक दिवशीय १०० पिल्ले वाटप



जिल्हातील कुक्कुट पालनाचा विकास होण्यासाठी जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत सर्व संवर्गातील गरीब होतकरू पशुपालक यांना ५०% अनुदानावर १ दिवशीय १०० पिल्लांचे गट याचबरोबर खाद्य वाटप करणे.

## जिल्हा वार्षिक योजना - आदिवासी उपयोजना

या योजनेंअंतर्गत अनुसूचित जमाती लाभार्थीना स्वयंरोजगाराद्वारे उत्पनाचे साधन उपलब्ध करून देणे . या योजने अंतर्गत खालील योजनांचा सामावेश आहे .

### दोन दुधाळ जनावरांचे वाटप –(अनुसूचित जमाती लाभार्थी )



दोन दुधाळ जनावरांचे शासनाने विहित केल्यानुसार एका गाईची रक्कम रु. ७०,०००/- व एका म्हैशीची रक्कम रु. ८०,०००/-आहे. या योजनेअंतर्गत ७५% शासकीय अनुदान रु. १,१७,६३८/- दोन गाईसाठी व रु. १,३४,४४३/- दोन म्हैशी साठी विम्यासह निर्धारित आहे .

### शेळी गट (१०+१) वाटप (अनुसूचित जमाती लाभार्थी )



शेळीगट (१०+१) शासनाने विहित केलेली रक्कम रु. ७८,२३१/- आहे. ७५% शासकीय अनुदान रु. ५८,६७३ /- विम्यासह निर्धारित आहे.

## जिल्हा वार्षिक योजना – विशेष घटक कार्यक्रम

विशेष घटक कार्यक्रम अंतर्गत अनुसूचित जाती / नव बौद्ध लाभार्थीना स्वयंरोजगाराद्वारे उत्पनाचे साधन उपलब्ध करून देणे. या योजने अंतर्गत खालील योजनांचा सामावेश आहे .

### दोन दुधाळ जनावरांचे वाटप –( अनुसूचित जाती / नव बौद्ध लाभार्थी )



दोन दुधाळ जनावरांचे शासनाने विहित केल्यानुसार एका गाईची रक्कम रु. ७०,०००/- व एका म्हैशीची रक्कम रु. ८०,०००/-आहे. या योजनेअंतर्गत ७५ % शासकीय अनुदान रु. १,१७,६३८/- दोन गाईसाठी व रु. १,३४,४४३/- दोन म्हैशीसाठी विम्यासह निर्धारित आहे .

### शेळी गट (१०+१) वाटप (अनुसूचित जाती / नव बौद्ध लाभार्थी )



शेळीगट (१०+१) शासनाने विहित केलेली रक्कम रु. ७८,२३१/- आहे. ७५% शासकीय अनुदान रु. ५८,६७३ /- विम्यासह निर्धारित आहे.

### पशुसंवर्धन विषयक प्रशिक्षण देणे –( अनुसूचित जाती / नव बौद्ध लाभार्थी )



या योजनेंतर्गत गाई / म्हैशीचे व्यावस्थापन शेळी पालन / कुक्कुट पालन/ स्वच्छ दुध निर्मिती बाबत प्रशिक्षण देवून पशुसंवर्धन संबंधित माहिती व कौशल्य वृद्धींगत करणे. प्रशिक्षण कालावधी 3 दिवसांचा आहे.